अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा

www.surajyadigital.com | मंगळवार, दि. १५ ऑगस्ट २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ३१७ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

**सुराज्य**

**उद्याचा अंक नाही**

स्वातंत्र्य दिनानिमित्त सुराज्यकार्यालयास १५ऑगस्ट २०२३ रोजी सुट्टी असल्याने उद्या दि. १६ ऑगस्ट २०२३ चा अंक प्रकाशित होणार नाही, याची नोंद वाचक, विक्रेते, जाहिरातदार यांनी घ्यावी.

-व्यवस्थापकीय संचालक

**तिसरा डोळा**

– प्रकाश पोरे



स्वातंत्र्य दिन!

कल्याण 469-95-339

मुंबई 239-44-266

# ‘सीएम’ बदलाची उठलीय ‘वावटळ’

# गुप्त भेटीने आघाडीत उडाली ‘खळबळ’

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

राज्यात राजकीय घडामोडींना पुन्हा वेग आला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बदलण्यात येणार असल्याची वावटळ उठली आहे.शिंदेंना बाजूला सारून महायुतीच्या सत्तेत नुकतेच सामील झालेले अजितदादा पवार यांना सीएम करण्याच्या हालचाली सुरू झाल्याचे संकेत आहेत. आजारपणाचे कारण पुढे करून शिंदेंना या पदावरून हटवण्यात येईल आणि त्यांच्या जागी अजितदादांना बसवण्याचा भाजपचा प्लॅन असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. या चर्चेने शिंदे गटातील आमदारांमध्ये खळबळ उडाली आहे. एकीकडे ही चर्चा असतानाच दुसरीकडे शनिवारच्या काका–पुतण्याच्या गुप्त भेटीने महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि शिवसेना या दोन पक्षांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. शरद पवारांची ही भूमिका समोर आल्यानंतर काँग्रेस वेगळी चूल मांडण्याच्या मनस्थितीत असून उद्धव ठाकरे गटाने शरदरावांवर थेट हल्ला चढवला आहे.

काँग्रेसचे नेते तथा विधान सभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सोमवारी मुंबईत पत्रकारांशी बोलताना सीएम बदलाच्या विषय समोर आणला. शिंदे यांच्या आजारपणाचे कारण देत त्यांना मुख्यमंत्रिपदावरुन दूर करण्याचे प्रयत्न आहेत, अशी शंका त्यांनी उपस्थित केली. शिंदेंना हटवून उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मुख्यमंत्री करण्याचा डाव तर नाही ना? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तेरा दिवसांच्या अधिवेशन काळात शिंदे विधानपरिषदेत केवळ दोन वेळा गेले, तर विधानसभेत चार वेळा. त्यांची उपस्थितीही दीड-दोन तासांची होती, याकडे वडेट्टीवार यांनी लक्ष वेधले. शिंदे हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत, महाराष्ट्राला त्यांच्या तब्येतीची काळजी असते, त्यामुळे याबाबत खुलासा स्पष्ट होणे अपेक्षित आहे. ते एका पक्षाचे नाही तर राज्याचे मुख्यमंत्री आहेत. असेही वडेट्टीवार म्हणाले.

## शिंदे गटाच्या आमदारांमध्ये सुरूय पळापळ

  

### अजितदादा सीएम,मुळीच नाही.

अजित पवारांना मुख्यमंत्री केले जाईल, असे मला मुळीच वाटत नाही,असे काँग्रेसचे माजी खासदार हुसेन दलवाई यांनी म्हटले आहे. माझ्या मते अपात्रतेचा निकाल लागणारच नाही. आणखी काही दिवस असेच ढकलले जातील. काहीही निकाल लागला तरी सरकारवर काहीही परिणाम होईल, असे मला वाटत नाही. ते निकाल अशाप्रकारे लावतील की, कुणाचेही सदस्यत्व रद्द होणार नाही. हे सरकार ढकलून–ढकलून चालवले जाईल,असे भाकितही त्यांनी वर्तवले.

### 'एक टीम अगोदर गेलीय, दुसरी टीम नंतर जाईल'

पवारांच्या गुप्त बैठकीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी ट्विट केले आहे. एक टीम आधी पाठवली दुसरी पण लवकरच जाईल, असे राज म्हणाले आहेत. आतून सगळे ऐकमेकांना मिळाले आहेत. २०१४ सालापासून हे सर्व सुरु आहे. शरद पवार आणि अजित पवार यांना भेटण्याची जागा 'चोर'डीया यांच्या घरीच मिळाली हे कमाल आहे.

### ...तर भाजपची वाट धरू

शिंदे व त्यांचे आमदार यांच्यावर अपात्रतेची कारवाई होईल व त्यानंतर शिंदे व त्यांचे आमदार हे भाजपमध्ये जातील, अशा चर्चांना राज्यात उधाण आला आहे. या विषयावर बोलताना जळगावतील पाचोरा तालुक्याचे शिवसेना शिंदे गटाचे आमदार किशोर पाटील यांनी खळबळजनक वक्तव्य केले आहे. शिंदे जो निर्णय घेतील, तो निर्णय आम्हाला मान्य असेल. आम्हाला भाजपच्या कमळ या चिन्हावर निवडणूक लढवायची असेल तरी तो मान्य असेल. भाजपच्याच काय पण शिंदे यांनी सांगितले तर आम्ही अपक्ष सुद्धा निवडणुका लढवू. त्यांच्या या वक्तव्यावरुन राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

### पटोलेंचा सूचक इषारा

काका–पुतण्याच्या या भेटीनंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचा उरलेला गटही सत्तेत सामील होणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.या भेटीनंतर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. त्यानंतर पटोले यांनी सूचक इशारा दिला आहे. जनतेच्या मनात महाविकास आघाडीबाबत संभ्रम झालेले आम्ही सहन करणार नाही. या इशाऱ्याने महाविकास आघाडीमध्ये सर्वकाही आलबेल नाही हे आता स्पष्ट झाले आहे.

### राऊतांच्या कानपिचक्या

काका–पुतण्याच्या भेटीवर उद्धव ठाकरे गटाचे संजय राऊत यांनी परखडपणे भाष्य केले. ही लढाई देशाची आणि राज्याची आहे. त्यात महाभारताप्रमाणे स्वकीय, मित्र, नातीगोती यांची पर्वा आम्हाला करता येत नाही. महाराष्ट्राची अस्मिता आणि देशाचे अस्तित्व टिकवण्याची ही लढाई आहे. लोकांमध्ये संशय आणि संभ्रम येईल अशी भूमिका किमान भीष्म पितामहांकडून तरी अपेक्षित नाही. नातीगोती, प्रेम घरात. या राज्यासमोर आव्हान उभे करण्यात आले आहे. चुकीच्या लोकांबरोबर हातमिळवणी करून जर कुणी आम्हाला आव्हान देत असेल, तर ते आमचे नातेवाईक नाहीत, अशा शब्दांत संजय राऊतांनी थेट शरद पवारांना कानपिचक्या दिल्या आहेत.

